ePaper

## चोरायला बाळासाहेब वस्तू नाही, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंवर घणाघात



| वर्ष - 7 | अंक - 270 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- टीम इंडियाला मोठा झटका!
- आलियाचा हटके लूक चर्चेत
- काँग्रेसला आणखी एक धक्का!
- भ्रष्टाचार करा आणि भाजपात या!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 13 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अशोक चव्हाणांचा काँग्रेसला रामराम!

» लवकरच कमळ हाती घेणार? भाजप प्रवेशातून काय साधणार?

» लातूर, चंद्रपूर, अमरावतीतले दिग्गज महायुतीच्या वाटेवर

**| मुंबई | महाईन्यूज**

**माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे दिग्गज नेते अशोक चव्हाण भाजपमध्ये जाण्याची शक्यता आहे. अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनामापत्रात माजी विधानसभा सदस्य असा उल्लेख आहे. माजी शब्द हातानं लिहिण्यात आलेला आहे. पत्रातील बाकीचा मजकूर छापील आहे. चव्हाण यांचा राजीनामा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी स्वीकारलेला आहे.**





माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण लवकरच भाजप प्रवेश करतील अशी चर्चा आहे. चव्हाण यांचं वर्चस्व आणि वजन पाहता त्यांच्या पक्ष प्रवेशाला भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित राहू शकतात. काँग्रेसचे आणखी काही आमदारही चव्हाण यांच्या पाठोपाठ राजीनामा देऊ शकतात. तशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### चव्हाण भाजपसोबत का जातील?

१ वातावरण भाजपच्या बाजूनं- देशातील वातावरण भाजपच्या बाजूनं आहे. राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यानंतर त्यात भर पडली आहे. अनेक सर्वेक्षणांमधून समोर आलेली आकडेवारी सत्ताधारी भाजपच्या बाजूनं आहे. त्यामुळे भविष्यातील संधींचा विचार करता चव्हाण कमळ हाती घेऊ शकतात.

२ स्थानिक राजकारण- २०१४ मध्ये मोदी लाटेतही अशोक चव्हाण यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. पण २०१९ मध्ये त्यांच्या पदरी पराभव पडला. भाजप उमेदवार प्रताप चिखलीकर यांनी त्यांचा पराभव केला. पण त्यांना छाप पाडता आलेली नाही. अशा परिस्थितीत भाजपला चव्हाणांच्या रुपात पर्याय आणि चांगला चेहरा मिळू शकतो.

३ आदर्श प्रकरण- आदर्श प्रकरणात अशोक चव्हाणांवर आरोप झाले. तेव्हा भाजप विरोधात होता. आता परिस्थिती उलट आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा पाठी लागल्यानं काँग्रेस, राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आदर्श प्रकरणाची सध्या चर्चा नाही. पण चव्हाण अधिक सक्रिय झाल्यास हे प्रकरण चर्चेत येऊ शकतं. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर येत असताना चव्हाणांच्या आदर्श प्रकरणाची चर्चा सुरू झाली होती. भाजपमध्ये गेल्यास यंत्रणांचा ससेमिरा थांबतो असा अनेक नेत्यांचा अनुभव आहे.

४ मराठवाड्यात भाजपला चेहरा- मुख्यमंत्रिपद भूषवलेल्या चव्हाण यांचा राजकीय अनुभव मोठा आहे. त्याचा फायदा भाजपला मराठवाड्यात होऊ शकतो. मराठवाड्यात पंकजा मुंडेंचा चेहरा भाजपकडे आहे. पण गेल्या निवडणुकीत त्या पराभूत झाल्या होत्या. चव्हाणांनी हाती कमळ घेतल्यास भाजपला मराठवाड्यात मोठा फायदा होईल.

५ काँग्रेसमधील सुंदोपसुंदी- पक्षांतर्गत सुंदोपसुंदीमुळे अशोक चव्हाण नाराज असल्याच्या चर्चा होत्या. काँग्रेस प्रदेशाध्यक्षपद नाना पटोले यांच्याकडे आहे. त्यांच्या नेतृत्वात काम करताना चव्हाण यांना अडचणी येत होत्या. भाजपमधून आलेल्या नाना पटोलेंच्या नेतृत्वात त्यांची घुसमट सुरू होती. पक्ष सत्तेत येण्याची शक्यता दिसत नसल्यानं आणि विरोधात बसून राजकारण करणं अवघड असल्यानं चव्हाण भाजपमध्ये प्रवेश करू शकतात.

### सोनिया गांधींची लोकसभा निवडणुकीतून माघार?

» देशभरातील सर्वच पक्षांनी लोकसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. राजकीय पक्षांकडून एका बाजूला लोकसभेसाठी मोर्चेबांधणी चालू असताना केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह १५ राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार, २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारांना १५ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येईल. सर्वच पक्षांनी राज्यसभेसाठी उमेदवारांची नावे जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी राजस्थान किंवा हिमाचल प्रदेशमधून राज्यसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> माझ्यासाठी पक्षाने खूप केलं पण मी देखील पक्षासाठी खूप कष्ट घेतले. जन्मापासून आतापर्यंत काँग्रेसचं काम केलं. आता अन्य पर्याय पाहिले पाहिजेत यासाठी मी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिला, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिली. त्याचवेळी मी काँग्रेस पक्षाचा प्राथमिक सदस्यत्वाचा आणि विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला आहे. प्रत्येक गोष्टीला काही कारण असावंच असं नाही. काँग्रेसमध्ये होतो तोपर्यंत पक्षाचं प्रामाणिकपणे काम केलेलं आहे. कोणाबद्दलही व्यक्तिगत माझ्या मनात वेगळी भावना नाही. यापुढची राजकीय दिशा ठरविण्यासाठी एक दोन दिवसांचा अवधी लागेल. पुढच्या दोन दिवसांत माझी राजकीय भूमिका स्पष्ट करेन. परंतु भाजपमध्ये जाण्याचा अद्याप निर्णय नाही.
>
> **- अशोक चव्हाण**

> काँग्रेस पक्षाने अनेक नेत्यांना खूप काही काही दिले आहे. आज काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई लढत असताना सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्दैवी आहे. नाना पटोले म्हणाले की, कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता उघड्या डोळ्याने पाहत आहे. आम्ही सर्व काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते काँग्रेसचा विचार आणि लोकशाही वाचविण्यासाठी धर्मांध, हुकुमशाही वृत्तीच्या भारतीय जनता पक्षाविरोधात पूर्ण ताकदीनिशी लढून त्यांना पराभूत करू.
>
> **-नाना पटोले,** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष

### काँग्रेसला गळती



» भाजपाने आगामी लोकसभा निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघ जिंकण्यासाठी अन्य पक्षातील कोणत्या नेत्यांचा उपयोग होईल, याद्दष्टीने नियोजन केलं आहे. संबंधित नेत्याने भाजपमध्ये प्रवेश करायचा की सहकारी पक्षात, याबाबतचे धोरणही बहुतांश प्रकरणांमध्ये भाजपाच ठरवीत आहे. काँग्रेसचे माजी खासदार मिलींद देवरा यांनी नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे वडील मुरली देवरा हे ज्येष्ठ काँग्रेस नेते होते आणि दीर्घकाळ केंद्रीय मंत्री होते. गांधी घराण्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते.

मिलींद देवरा यांचेही ज्येष्ठ नेते राहुल गांधींसह काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी चांगले संबंध होते. पण राजकीय भवितव्याच्या द्दष्टीने देवरा हे भाजपबरोबर सत्तेत असलेल्या शिंदे गटात सामील झाले. देवरा यांच्यापाठोपाठ काँग्रेस नेते बाबा सिद्दीकी यांनीदेखील नुकताच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

# विकास होण्यासाठी महापालिका आवश्यक !

## पुणे जिल्ह्यातील तिसऱ्या पालिकेबाबत अजित पवार यांची घोषणा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरानजीकच्या गावात बेकायदेशीर बांधकामे, रस्त्यांचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे व्यवस्थित विकास होण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका असणे आवश्यक असून देहू, आळंदी, चाकण, राजगुरूनगर मिळून एक महानगरपालिका करता येईल का याबाबत विचार सुरू आहे, असे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार म्हणाले.**

अजित पवार यांच्या हस्ते लोहगाव येथे लोहगाव- वाघोली समान पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन, धानोरी सर्वे नं. ७ येथे बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार सुनील टिंगरे, चेतन तुपे, माजी आमदार रामभाऊ मोझे, मनपा आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे या वेळी उपस्थित होते.लोहगावच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येतील. संरक्षण विभागाच्या हद्दीत असलेला रस्ता बाहेरून काढून घेतल्यास येथील विमानतळाचे विस्तारीकरण करून मोठी आंतरराष्ट्रीय विमाने उतरू शकतील. कोणत्याही विकास प्रकल्पांना जागा आवश्यक असते. जागेच्या मूल्यांकनाबाबत काही अडचणी असल्यास नोंदणी विभागाशी बोलून मार्ग काढण्यात येईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. पाण्याच्या समस्येबाबत अजित पवार म्हणाले, की पुण्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात रोजगाराच्या शोधात लोक येतात. त्यांना पाणी, आरोग्य, निवारा आदी सुविधा पुरवाव्या लागतात. त्यामुळे इंदापूर, हवेली, दौंड, पुरंदर तालुक्यातील शेतीला पाणी कमी पडत आहे. पाणी बचत व्हावी म्हणून कालव्याऐवजी



बोगदा करण्याचे नियोजन आहे. पुण्याच्या पाण्यासह, शेतीला पाणी मिळावे म्हणून टाटाच्या धरणातून पाणी मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वापरलेले सांडपाणी प्रक्रिया करून शेतीला देण्यायोग्य करण्यासाठी आवश्यक तेथे एसटीपी उभारण्यात येतील. नागरिकांना सुविधा देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीत भरीव वाढ केली आहे. लोहगाव येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी पीएमपीएमएलची बीआरटी लेन बंद केली. तसेच कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. रिंग रोड झाल्यानंतर हा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटेल, असेही अजित पवार यांनी सांगितले. राज्य शासन नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. राज्यात नोकरभरती मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे. त्यासोबतच ठिकठिकाणी रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विविध आस्थापनांमध्ये युवांना रोजगार मिळावा म्हणून प्रयत्न सुरू आहेत. राज्यात नवीन युवा धोरण बनविण्यात येणार आहे. आयटीआय मध्ये रोजगारक्षम नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्याचा युवकांना फायदा होईल, असे अजित पवार म्हणाले.राज्यातील महत्वाच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी प्रकल्प संनियंत्रण समिती केली असून त्या माध्यमातून मेट्रो, रिंग रोड, मोठी रुग्णालये, बंदरे, समुद्र किनारी मार्ग आदी विविध विषयांच्या प्रकल्पांचा आढावा देऊन त्यांना गती दिली जात आहे. राज्यभरात टिकाऊ रस्ते व्हावेत म्हणून ते डांबरी ऐवजी काँक्रिटचे करण्याचे प्रयत्न आहेत, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.आमदार सुनील टिंगरे म्हणाले, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या माध्यमातून विविध विकासकामांना निधी मिळत आहे.

लोहगाव – वाघोली समान पाणीपुरवठा योजनेसाठी २३० कोटी रुपये मंजूर असून एकूण ४५० कि.मी. च्या वितरण नलिकांपैकी २३० कि.मी. नलिका फक्त लोहगावमध्येच आहेत. २० लक्ष हून अधिक क्षमतेच्या ८ टाक्या येथे असून नवीन ९ टाक्यांची कामे सुरू होत आहेत. लोहगाव उपजिल्हा रुग्णालयचे काम अंतिम टप्प्यात असून लोहगाव आयटीआय साठी निधी मंजूर आहे. रस्ते, भूमिगत सांडपाणी वाहिन्या यासाठी निधी मंजुरीचे प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. अजित पवार यांच्या हस्ते लोहगाव येथे लोहगाव- वाघोली समान पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन, धानोरी सर्वे नं. ७ येथे बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन झाले.

### पाणी बचत व्हावी म्हणून बोगदा

आमदार सुनील टिंगरे, चेतन तुपे, माजी आमदार रामभाऊ मोझे, मनपा आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे या वेळी उपस्थित होते.लोहगावच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येतील. संरक्षण विभागाच्या हद्दीत असलेला रस्ता बाहेरून काढून घेतल्यास येथील विमानतळाचे विस्तारीकरण करून मोठी आंतरराष्ट्रीय विमाने उतरू शकतील. कोणत्याही विकास प्रकल्पांना जागा आवश्यक असते. जागेच्या मूल्यांकनाबाबत काही अडचणी असल्यास नोंदणी विभागाशी बोलून मार्ग काढण्यात येईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. पाण्याच्या समस्येबाबत अजित पवार म्हणाले, की पुण्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पाणी बचत व्हावी म्हणून कालव्याऐवजी बोगदा करण्याचे नियोजन आहे.

# नदीपात्रात घोंघावणारे कीटक नेमके कोणते?

## पालिकेकडे माहितीच नाही; आरोग्य विभागाला नमुने घेण्याचाही विसर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नदीपात्रात डासांसारख्या कीटकांचे थवे मोठ्या संख्येने दिसून आले होते. याचे व्हिडीओही समाजमाध्यमांत पसरले होते. हे कीटक डास नसावेत, असा अंदाज कीटकशास्त्रज्ञांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे नेमके हे कीटक कोणते, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**



एवढ्या मोठ्या प्रमाणात कीटकांचे थवे दिसूनही महापालिकेने त्यांचे नमुने गोळा केले नाहीत. त्यामुळे महापालिका नागरिकांच्या आरोग्याबाबत किती गांभीर्याने पावले उचलते ही बाबही समोर आली आहे.केशवनगर आणि खराडी गावठाण भागात नदीपात्रात कीटकांचे थवे दिसून आले होते. अनेक नागरिकांनी याचे व्हिडीओ काढून समाजमाध्यमांवर टाकले होते. नदीपात्रात पाण्याची पातळी वाढल्याने हे डासांचे थवे, असे उडत असल्याचे सांगितले जात होते. प्रत्यक्षात हे डास नसावेत, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. कारण डास हे एवढ्या उंचीवर उडत नाहीत आणि ते एकदम एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र दिसून येत नाहीत, असे कीटकशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे विचारणा केली असता, कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. आरोग्य विभागाने ते डास नसावेत, असे सांगितले. प्रत्यक्षात ते कीटक नेमके कोणते होते, हे तपासण्यासाठी त्यांचे नमुने गोळा करण्याचे कामही आरोग्य विभागाने केले नाही. त्यामुळे ते कीटक कोणते हा प्रश्न अनुत्तरित आहे. हे कीटक नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक आहेत की नाही, याचेही उत्तर महापालिकेकडे नाही. त्यामुळे महापालिका नागरिकांच्या आरोग्याबाबत किती गांभीर्याने विचार करते, ही बाब समोर आली आहे.नदीपात्रात कीटकांचे थवे दिसून आल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी महापालिकेला तातडीने कार्यवाहीच्या सूचना केल्या आहेत.

### डास जास्त उंचीवर उडत नाही

की डासांचे थवे सायंकाळच्या वेळी दिसून येतात. मिलनाच्या काळात सगळ्या प्रकारचे कीटक थव्याने उडतात. हे नर कीटक असतात आणि ते मादीला आकर्षित करण्यासाठी असे उडत असतात. व्हिडीओमध्ये दिसत आहेत तेवढ्या मोठ्या प्रमाणात डासांचे थवे आतापर्यंत तरी दिसून आलेले नाहीत. याचबरोबर डास जास्त उंचीवर उडत नाही.

# ‘इको पार्क’मधील वृक्षतोडीच्या निषेधार्थ पर्यावरणप्रेमींचे मुंडन आंदोलन!

## पाण्याअभावी झाडे मारली जात आहेत, तेथील जैवविविधता नष्ट करण्यात येतेय

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**रावेत येथील इको पार्कची जागा ही बनावट पंचनामा करून हस्तांतरित करण्यात आली. या ठिकाणी निवडणूक आयोग अनधिकृत बांधकाम करत असल्याचा आरोप करत त्यासाठी वृक्षतोड केल्याच्या निषेधार्थ पर्यावरणप्रेमींनी मुंडन आंदोलन केले. रावेतमधील इको पार्क गेल्या काही महिन्यांपासून बंद करण्यात आले आहे. याकडे महापालिका, पोलीस आणि जिल्हाधिकारी कार्यालय जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. पाण्याअभावी झाडे मारली जात आहेत, तेथील जैवविविधता नष्ट करण्यात येत आहेत.**



### झाडे जगविण्यासाठी पर्यावरणप्रेमी सरसावले

झाडे जगविण्यासाठी पर्यावरणप्रेमी सरसावले असून, इको पार्क सर्वांसाठी खुला करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. मात्र, हे पार्क खुले न केल्याने प्रशासनाच्या निषेधार्थ मुंडन आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून इको पार्कमधील झाडे पाण्याअभावी सुकत आहेत. डिसेंबरमध्ये पर्यावरणप्रेमींनी उद्यान विभागाकडे सर्वेक्षण करण्याची मागणी केली होती. त्यात सुमारे १४० दुर्मिळ झाडे सुकल्याचा अहवाल देण्यात आला होता. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी झाडे वाचविण्यासाठी स्वखर्चाने टँकरने पाणी सोडले. तसेच झाडांना पाणी मिळावे, ती जगावीत यासाठी हे पार्क खुले करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात येत असल्याची माहिती पर्यावरणप्रेमी प्रशांत राऊळ यांनी दिली.

---

# “प्रेयसी” या छायाचित्र प्रदर्शनातून कलावंताचे वेगळेपण प्रकट!

## सुप्रसिद्ध गीतकार, कवी गुरू ठाकूर यांचे प्रतिपादन

।पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कलावंत आणि सामान्य माणसात फरक असतो, यातील कलावंताचे वेगळेपण प्रसिद्ध छायाचित्रकार देवदत्त कशाळीकर यांच्या “प्रेयसी” या छायाचित्र प्रदर्शनातून पाहायला मिळते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध गीतकार, कवी गुरु ठाकूर यांनी केले. देवदत्त कशाळीकर यांच्या प्रेयसी या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन सोमवारी (दि.१२) ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक महेश कुडाळकर, कलारंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित गोरखे, सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, महानगरपालिकेतील निवृत्त अधिकारी प्रवीण तुपे, सकाळ समूह संपादक सम्राट फडणीस, ज्येष्ठ पत्रकार जयंत जाधव, विवेक इनामदार, विश्वास मोरे, गोविंद वाकडे, नाझीम मुल्ला, कैलास पुरी, मिलिंद भुजबळ आयोजक देवदत्त आणि वर्षा कशाळीकर आदी उपस्थित होते. बुधवार (दि.१४ फेब्रुवारी) पर्यंत सकाळी दहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्व कला रसिकांना विनामूल्य पाहण्यास मिळणार आहे.

गुरू ठाकूर म्हणाले की, उत्कृष्ट कलाकृती पाहिल्यावर दुसऱ्याला काहीतरी करण्याची प्रेरणा देते अशा सर्वोत्तम फोटोचे प्रदर्शन “प्रेयसी” हे सर्वांनी आवर्जून पाहिले पाहिजे. मी या फोटोंना कविता दिल्या आहेत, त्याचे खरे श्रेय हे देवदत्त मध्ये असलेल्या कलाकाराचे आहे. प्रत्येकाने आपल्या हृदयातील नाजूक कप्प्यात प्रेयसीची आवडती प्रतिमा चिरंतन जपलेली असते. ती त्यांच्या कल्पनेतून आणि कॅमेरातून टिपली आहे. ही प्रेयसी आणि निसर्ग यांचं नातं छायाचित्र प्रदर्शनातून कला रसिकांना मंत्रमुग्ध करणारी आहे. चेहऱ्याच्या पलीकडे जाऊन पण सौंदर्य आणि सृजनतेची एक परिभाषा असते. अशी मनाला भुरळ घालणारी छायाचित्रे आपल्या हृदयाशी संवाद साधतात अशा शब्दात ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

सम्राट फडणीस यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, हे प्रदर्शन महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये झाले पाहिजे.

# पिंपळे सौदागर मधील युवा पिढीची राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण भरारी हा एक अभिमानास्पद क्षण



।पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

नागपूर येथे झालेल्या थाईबॉक्सिंग राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पिंपळे सौदागर येथील यु.एफ.एफ.सी क्लबचे विद्यार्थी यांनी कु.अवनिश गंगमवर, कु. ईशान बोंगाळे, कु.आयुष मिश्रा आणि कु.लक्ष्य मांजरेकर यांनी वयोगट १२ वर्षे, १४ वर्षे आणि १८ वर्षे थायबॉक्सिंग स्पर्धेमध्ये “सुवर्ण पदक” मिळविल्याबद्दल नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सुवर्ण भरारी घेणाऱ्या या सर्व स्पर्धकांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

आपल्या परिसराचे नाव राष्ट्रीय पातळीवर अधोरेखित करण्याची किमया या नव्या पिढीने करून दाखविले. पुढील काळात अशीच घवघवीत यश संपादन करून पिंपळे सौदागरचे नाव देश पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवा अश्या शुभेच्छा ही दिल्या. यावेळी पिंपरी चिंचवड थाई बॉक्सिंग अध्यक्ष श्री नरेश म्हेत्रे सर, प्रशिक्षक पल्लवी पाटील व पालक उपस्थित होते.




# चिप-चरित्र : शीतयुद्धाचे लाभार्थी

**पन्नासच्या दशकाच्या अंतापर्यंत सेमीकंडक्टर चिप क्षेत्र जरी बाल्यावस्थेतच असलं तरीही त्यात बरीच उलथापालथ झाली होती. बेल लॅब्सने 'ट्रान्झिस्टर'चा शोध लावला होता. विविध ट्रान्झिस्टर्सचं एकत्रीकरण करून किल्बी आणि नॉईस यांनी समांतरपणे 'इंटिग्रेटेड सर्किट'ची (आयसी) निर्मिती केली होती.**

एका बाजूला टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स तर दुसऱ्या बाजूला नॉईस आणि सहकाऱ्यांनी स्थापन केलेली फेअरचाइल्ड सेमीकंडक्टर या दोन्ही अमेरिकी कंपन्या चिपनिर्मितीच्या अभियांत्रिकी प्रक्रियेत गुंतल्या होत्या. निर्वात नलिकेपेक्षा सेमीकंडक्टर चिप ही कार्यक्षमता, सुटसुटीतपणा, देखभाल, टिकाऊपणा अशा सर्वच मानकांवर किती तरी पटीने श्रेष्ठ उत्पादन आहे याबाबतीत कोणाचंच दुमत नसलं तरीही चिप उद्योगाच्या वेगवान वाटचालीसाठी महत्त्वाच्या असलेल्या दोन गोष्टी अजूनही अनुत्तरितच होत्या. चिपचं किफायतशीर पद्धतीनं मोठ्या प्रमाणावर उत्पादन कसं करायचं हा पहिला प्रश्न! चिपनिर्मितीचा खर्च एवढा अवाढव्य होता की कमी प्रमाणात चिपचं उत्पादन हा आतबट्ट्याचा व्यवहार ठरला असता आणि असं असताना कोणतीही कंपनी अशा धंद्यात उतरणं आणि उतरली तरी फार काळपर्यंत टिकणं कठीणच होतं. अमेरिकी शासनाचा नवउद्यमींना



पाठिंबा असला तरीही एकंदरच अमेरिकेचा भांडवलशाहीवर दृढ विश्वास असल्यानं सरकारी अनुदान, करकपात अशा पद्धतीची शासकीय मदत मिळण्याची शक्यता दुरापास्त होती. अशा वेळेला चिपचं उत्पादन सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणात करण्याशिवाय पर्याय नव्हता.दुसऱ्या बाजूला जरी प्रचंड संख्येनं चिपचं उत्पादन केलं गेलं तरी अशा मोठ्या प्रमाणावर निर्मिल्या गेलेल्या चिपची खरेदी कोण करणार हा यापुढचा प्रश्न. सेमीकंडक्टर पदार्थामागील भौतिकी विज्ञानच एवढं नवं होतं की त्यापासून बनलेल्या चिपचा योग्य वापर करण्यासाठी कोणतंही उत्पादन बाजारात उपलब्ध नव्हतं. आणि अर्थशास्त्राच्या नियमानुसार जर एखाद्या पदार्थाला विशेष मागणीच नसेल तर त्याचं उत्पादन, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी कोणतीही संस्था किंवा कंपनी तयार होण्याची शक्यताच नव्हती. म्हणजेच या क्षेत्रापुढचे हे दोनही यक्षप्रश्न कोंबडी आधी की अंडं या प्रश्नासारखे एकमेकांत गुंतलेले होते. पन्नासच्या दशकाच्या अंतापर्यंत अमेरिकेत चिप उद्योग अनिश्चिततेच्या गर्तेत अडकला होता. सेमीकंडक्टर विज्ञान पुढे जात होतं पण चिपचा योग्य वापर नक्की कशासाठी करायचा हे पुरेसं स्पष्ट होत नव्हतं. अशा वेळेला अत्यंत अनपेक्षितपणे अमेरिका व रशिया या तत्कालीन महासत्तांमध्ये सुरू असलेलं शीतयुद्ध चिप उद्योगाच्या मदतीला धावून आलं. ४ ऑक्टोबर १९५७ रोजी सोव्हिएत रशियाने आपला 'स्पुटनिक' हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केला. तशी १८००० मैल अशा प्रचंड वेगानं पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या या लहानशा उपकरणानं अमेरिकी शासन, लष्कर व अमेरिकेची अंतराळ विज्ञान संस्था 'नासा' या सर्वांचीच झोप उडवली. हा उपग्रह रशियानं आपल्यावर पाळत ठेवण्यासाठी बनवला आहे याची अमेरिकी सरकार व समाज या दोघांनाही खात्री पटू लागली. चारच वर्षांनी, १२ एप्रिल १९६१ रोजी रशियानं अंतराळक्षेत्रात आणखी एक शिखर पादाक्रांत केलं; जेव्हा रशियन अंतराळवीर युरी गागारिन यानं पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करून अंतराळात जाणारा पहिला मानव म्हणून नाव मिळवलं. तंत्रज्ञानात आपण रशियाच्या लक्षणीयरीत्या मागे पडत आहोत याची जाणीव अमेरिकी नेतृत्वाला प्रकर्षानं व्हायला लागली. रशियावर कुरघोडी करण्यासाठी आणि अमेरिकी प्रसारमाध्यमं व समाजाकडून होणाऱ्या टीकेला प्रत्युत्तर म्हणून यानंतर वर्षभरातच १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडींनी, साठचे दशक संपायच्या आतच अमेरिकी माणूस चंद्रावर पाऊल ठेवेल अशी घोषणा केली. तर नासाने या घोषणेच्या अंमलबजावणीसाठी 'अपोलो मिशन'ची सुरुवात केली. पण पृथ्वीवरून अंतराळवीरांना घेऊन चंद्र गाठण्यासाठी अंतराळयानाला अत्यंत जटिल अशी गणितीय प्रारूपं व समीकरणं प्रचंड मोठ्या संख्येनं सोडवायला लागणार होती. इतकी गणनक्षमता असणारं तंत्रज्ञान नासाकडे निश्चितच उपलब्ध नव्हतं.

## संपादकीय »

### महसूलवाढीस हातभार


***लोकसंख्या-नियंत्रण करून, प्रगती साधून देशाच्या महसूलवाढीस हातभार लावणाऱ्या राज्यांच्या मागण्यांकडे विभाजनवादी नजरेतून पाहणे अयोग्यच..***

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांस राज्यासाठी केंद्राकडून अधिक महसूल-वाटा हवा आहे. तशी मागणी करण्यासाठी ते दिल्लीत धडकले तर त्याची संभावना अर्थमंत्र्यांनी खोटारडे अशी केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्धरामय्या यांच्या पक्षावर उत्तर-दक्षिण भेदभाव निर्माण करीत असल्याचा आरोप केला. पंतप्रधान म्हणून मोदी यांच्या भूमिकेविषयी सहानुभूती. याचे कारण गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी असताना नरेंद्र मोदी यांनी केंद्राविषयी असाच एल्गार वारंवार केला होता आणि केंद्र हे गुजरातवर अन्याय करते असे त्यांचे तेव्हा म्हणणे होते. तेव्हा अहमदाबादेतून दिसणारा भारत हा दिल्लीतून दिसणाऱ्या भारतापेक्षा वेगळा असू शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदी असतानाची भूमिका पंतप्रधानपदी गेल्यावर बदलू शकते हे सत्यही लक्षात येईल.

**डिसेंबर १९४६ मध्ये संविधान सभा स्थापन झाली. समित्या, उपसमित्या नेमल्या गेल्या. कामांचे वाटप झाले. १३ डिसेंबर १९४६ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत उद्देशिकेचा ठराव मांडला. नेहरूंनी हा ठराव मांडताच पुरुषोत्तम दास टंडन यांनी त्यास अनुमोदन दिले.**

# संविधानभान : संविधानाची प्राणप्रतिष्ठा

पूर्ण स्वराज्याच्या ठरावाच्या वेळी पं. नेहरू यांनी मसुदा तयार केला होता. तेव्हापासून स्वतंत्र भारताचे संकल्पचित्र त्यांच्या मनाच्या तळाशी होते. त्यानुसार नेहरूंनी या उद्देशिकेच्या ठरावाची मांडणी केली होती. हा उद्देशिकेचा ठराव म्हणजे भारतीय गणराज्याचे तात्त्विक अधिष्ठान होय. हा ठराव एखाद्या प्रतिज्ञेप्रमाणे किंवा शपथेसारखा आहे. भारताचा प्रत्येक नागरिक ही शपथ घेत आहे, घेणार आहे, हे डोळ्यासमोर ठेवून संविधान सभा ही शपथ स्वीकारत असल्याचे सूतोवाच या प्रतिज्ञेत आहे. या उद्देशिकेच्या ठरावात भारत हे स्वतंत्र, सार्वभौम गणराज्य असेल, असे म्हटले होते. यादिवशी मुस्लीम लीगचे आणि संस्थानांचे प्रतिनिधी गैरहजर होते, मात्र नेहरू म्हणाले : त्या सर्वांचा समावेश असणारे गणराज्य अस्तित्वात आणण्याचा आपला प्रयत्न असेल. या गणराज्याची अंतिम सत्ता लोकांकडे असेल. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य,



श्रद्धेचे स्वातंत्र्य आदी मूल्यांवर आधारित असे हे गणराज्य असेल. अल्पसंख्य, मागास जाती आणि आदिवासी क्षेत्रे यांना न्याय देईल, असे मूलभूत न्यायाचे तत्त्वही नेहरूंनी अधोरेखित केले.बारकाईने वाचले तर लक्षात येईल की भारतीय संविधानाची उद्देशिका हे एक दीर्घ वाक्य आहे. नानी पालखीवाला म्हणाले होते, "संविधानाची उद्देशिका हे संविधानाचे ओळखपत्र आहे." संविधानाचे ओळखपत्र म्हणजे पर्यायाने भारतीयांचे आयकार्ड. ही ओळख आपण काय विचार करतो आहोत, यानुसार सांगितले आहे आणि आपले सामूहिक स्वप्न काय आहे, याचा निर्देश केला आहे. त्यामुळे आपला विचार आणि आपली भविष्यातील दिशा या दोन्ही दृष्टीने उद्देशिकेचे महत्त्व आहे.

मौलाना हसरत मोहानी, एच व्ही कामत, दाक्षायनी वेलायुधन, के एम मुन्शी, पूर्णिमा बॅनर्जी, रोहिणी चौधरी यांसारख्या सदस्यांनी उद्देशिकेच्या ठरावावरील चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. बाबासाहेब आंबेडकरांनी याच ठरावाच्या अनुषंगाने संविधान सभेत दिलेले भाषण गाजले. या ठरावातील एकेका उताऱ्यावर बाबासाहेबांनी त्यांची मते मांडली.

संघराज्याच्या प्रारूपाविषयी बरेच मतभेद संविधान सभेतल्या सदस्यांमध्ये होते. प्रांतांच्या रचनेचा मुद्दाही या ठरावाच्या चर्चेदरम्यान आला. डिसेंबर १९४६ आणि जानेवारी १९४७ मध्ये या ठरावावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. ही चर्चा सविस्तर होणे जरुरीचे होते कारण हा संविधानाचा प्राण होता. अखेरीस सविस्तर चर्चेनंतर उद्देशिकेचा ठराव २२ जानेवारी १९४७ रोजी एकमताने मंजूर झाला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भ्रष्टाचार करा आणि भाजपात या!

## चव्हाणांना राज्यसभा दिली तर तुम्हीही जवानांचा अपमान कराल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आदर्श घोटाळा करून ज्या अशोकराव चव्हाण यांनी शहीद जवानांचा अपमान केला असे आपण म्हणत होता, त्यांना भाजपात घेऊन राज्यसभा दिली तर तुम्हीदेखील शहीदांचा अपमानच करत आहात, असे आम्ही मानू, असे उद्धव ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून म्हणाले. ते छत्रपती संभाजीनगर येथे जनसंवाद सभेत बोलत होते.**




हिंदुत्वाचे बोगस बी-बियाणे असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भ्रष्टाचार करा आणि भाजपात या ही मोदींची गॅरंटी आहे का, असा सवाल केला. भ्रष्ट तितुका मिळवावा, भाजपा वाढवावा असे सध्या चित्र दिसत आहे. जेव्हा मुंबईत शिवसेनेच्या कार्यकर्त्याला मारले जात होते तेव्हा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अशोक चव्हाण यांच्याबरोबर 'डील' करत होते, असा आरोपही त्यांनी केला. आमचे हिंदुत्व हे चूल पेटवणारे आहे, घर पेटवणारे नाही असे सांगत 'ढेकर-भाकर' भाजपात कितीही घेतले तरी त्याचा परिणाम होणार नाही. लोकांमध्ये चीड आणि संताप असून ते भाजपाला पराभूत करतील. कारण भाजप आता श्रीरामांचं नाही तर आयारामांचा पक्ष झाला आहे. केंद्र सरकार महाराष्ट्रकडून वसूल करत असलेल्या कराच्या एक रुपयातून केवळ आठ पैसे राज्याच्या विकासासाठी देते. महाराष्ट्रावर त्यांचे प्रेम नाही. त्यांचे प्रेम गुजरातवर आहे. केवळ गुजरातला उद्योग पळविल्याने गुजरात विरुद्ध अन्य राज्य अशी भिंत निर्माण केली जात आहे, असेही ठाकरे म्हणाले. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शहरातील समांतर पाणीपुरवठ्यासाठी शिवसेनेने केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तर शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सत्तार यांच्यावर विविध भ्रष्टाचाराच्या आरोपांची सक्तवसुली संचालनालयाने दखल घ्यावी व त्यांना अटक करावी अशी मागणी केली. पालकमंत्री संदीपान भूमरे यांच्यावरही त्यांनी टीका केली. यावेळी खासदार संजय राऊत यांचेही समयोचित भाषण झाले. केंद्र सरकारने मते मिळविण्यासाठी आता 'भारतरत्न'चा बाजार मांडला आहे. ज्यांना भारतरत्न दिला आहे त्यांच्याविषयी आणि त्यांच्या कामाविषयी आमची तक्रार नाही. पण ज्यस्डॉ. स्वामीनाथन यांना भारतरत्न दिला, त्यांच्या आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या तर आम्ही तुम्हाला मानू, असे ठाकरे म्हणाले. पीकविम्याचा लाभ शेतकऱ्यांना झाला नाही, असेही ते म्हणाले. रिकाम्या खुर्च्यांवर बसण्याचे आवाहन शहरातील सिडको भागात संभाजीमहाराज क्रीडांगणात आयोजित सभास्थळी उद्धव ठाकरे पोहोचेपर्यंत एका भागातील खुर्च्या रिकाम्या होत्या. त्यावर बसावे असे आवाहन शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना वारंवार करावे लागले. उद्धव ठाकरे यांचे भाषण सुरू होईपर्यंत नंतर गर्दी झाली. मात्र, क्रीडांगणातील सिमेंटच्या गॅलरी पूर्णत: भरलेली नव्हती. हिंदुत्वाचे बोगस बी-बियाणे असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भ्रष्टाचार करा आणि भाजपात या ही मोदींची गॅरंटी आहे का, असा सवाल केला. भ्रष्ट तितुका मिळवावा, भाजपा वाढवावा असे सध्या चित्र दिसत आहे. जेव्हा मुंबईत शिवसेनेच्या कार्यकर्त्याला मारले जात होते तेव्हा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अशोक चव्हाण यांच्याबरोबर 'डील' करत होते, असा आरोपही त्यांनी केला. आमचे हिंदुत्व हे चूल पेटवणारे आहे, घर पेटवणारे नाही असे सांगत 'ढेकर-भाकर' भाजपात कितीही घेतले तरी त्याचा परिणाम होणार नाही.

### संदीपान भूमरे यांच्यावरही टीका

» हिंदुत्वाचे बोगस बी-बियाणे असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भ्रष्टाचार करा आणि भाजपात या ही मोदींची गॅरंटी आहे का, असा सवाल केला. भ्रष्ट तितुका मिळवावा, भाजपा वाढवावा असे सध्या चित्र दिसत आहे. जेव्हा मुंबईत शिवसेनेच्या कार्यकर्त्याला मारले जात होते तेव्हा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अशोक चव्हाण यांच्याबरोबर 'डील' करत होते, असा आरोपही त्यांनी केला. आमचे हिंदुत्व हे चूल पेटवणारे आहे, घर पेटवणारे नाही असे सांगत 'ढेकर-भाकर' भाजपात कितीही घेतले तरी त्याचा परिणाम होणार नाही. लोकांमध्ये चीड आणि संताप असून ते भाजपाला पराभूत करतील. कारण भाजप आता श्रीरामांचं नाही तर आयारामांचा पक्ष झाला आहे.केंद्र सरकार महाराष्ट्रकडून वसूल करत असलेल्या कराच्या एक रुपयातून केवळ आठ पैसे राज्याच्या विकासासाठी देते. महाराष्ट्रावर त्यांचे प्रेम नाही. त्यांचे प्रेम गुजरातवर आहे. केवळ गुजरातला उद्योग पळविल्याने गुजरात विरुद्ध अन्य राज्य अशी भिंत निर्माण केली जात आहे, असेही ठाकरे म्हणाले. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शहरातील समांतर पाणीपुरवठ्यासाठी शिवसेनेने केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तर शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सत्तार यांच्यावर विविध भ्रष्टाचाराच्या आरोपांची सक्तवसुली संचालनालयाने दखल घ्यावी व त्यांना अटक करावी अशी मागणी केली. पालकमंत्री संदीपान भूमरे यांच्यावरही त्यांनी टीका केली.

# अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्यावर काँग्रेस नेत्याची टीका

## अशोक चव्हाण यांचा निर्णय धक्कादायक, दुर्दैवी आणि अन्यायकारक

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अशोक चव्हाण यांचा निर्णय धक्कादायक, दुर्दैवी आणि अन्यायकारक आहे. अन्यायकारक यासाठी कारण जे इमानदार आणि निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यांना याचे दुख वाटते. काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी पक्षाला उभारी देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. अशावेळी त्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम यानिमित्ताने झाले आहे.**



अशोक चव्हाण यांना चौकटीबाहेर जाऊन आजवर अनेक पदे दिली गेली. पक्षाने त्यांना मोठं केलं. असं एकही पद नाही, जे अशोक चव्हाण यांना मिळालं नाही. आता ते कार्यकारी समितीचे अध्यक्षही आहेत. अशावेळी अशोक चव्हाण यांनी जाणं, हे दुर्दैव आहे", अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार विलास मुत्तेमवार यांनी केली.विलास मुत्तेमवार यांनी टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधत असताना अशोक चव्हाण यांच्यावर जोरदार टीका केली. २००८ साली विलासराव देशमुख यांच्यानंतर वरिष्ठांना डावलून अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद दिले गेले. त्यावेळी त्यांचे वय अवघे ४२ एवढे होते. मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष, विरोधी पक्षनेता अशी अनेक पदे चव्हाणांना दिली. त्यांचे वडील दोनदा राज्याचे मुख्यमंत्री झाले होते, केंद्रातही त्यांनी अनेक पदे भूषविली होती. हे सर्व ते कसे काय विसरू शकतात? ज्या कुटुंबाला एवढं सर्व दिलं, त्याच कुटुंबाने असे करावे, यामुळे अनेक कार्यकर्ते दुखी झाले आहेत. सामान्य कार्यकर्ते नेत्यांच्या एका शब्दावर लाठ्या खातात. केसेस अंगावर घेतात, त्या कार्यकर्त्यांसमोर यांचा त्याग काहीच नाही, असे टीकास्र मुत्तेमवार यांनी सोडले.

### 400 पार अजिबात होऊ देणार

» मुत्तेमवार पुढे म्हणाले की, अशोक चव्हाण गेल्याने काँग्रेस संपणार नाही. याआधी असे बरेच लोक काँग्रेस सोडून गेलेले आहेत. तसेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून काँग्रेस नेते पक्ष सोडत आहेत का? असा प्रश्न विचारला असता मुत्तेमवार म्हणाले की, प्रदेशाध्यक्ष म्हणून नाना पटोले कदाचित चुकलेही असतील. पण त्यामुळे पक्ष सोडून जाणे, हा काही पर्याय नाही. अशोक चव्हाण प्रदेशाध्यक्ष असताना तेही परिपूर्ण नव्हते. त्यांच्याबद्दलही तक्रारी होत्या. तसेच इतर राज्यातील काँग्रेस नेते पक्ष सोडून चालले आहेत, ते काय नाना पटोले यांच्यामुळे जात नाहीत, असा टोलाही मुत्तेमवार यांनी लगावला.भाजपाकडे काही नीती राहिलेली नाही. बाहेरून लोक आणून ४०० पार करण्याचा त्यांचा विचार आहे. पण लोक हे अजिबात होऊ देणार नाही.

# काँग्रेसला आणखी एक धक्का!

## सोनिया गांधींची लोकसभा निवडणुकीतून माघार?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशभरातील सर्वच पक्षांनी लोकसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. राजकीय पक्षांकडून एका बाजूला लोकसभेसाठी मोर्चेबांधणी चालू असताना केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह १५ राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार, २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारांना १५ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येईल. सर्वच पक्षांनी राज्यसभेसाठी उमेदवारांची नावे जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी राजस्थान किंवा हिमाचल प्रदेशमधून राज्यसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एनडीटीव्हीने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.**




सोनिया गांधी या सध्या उत्तर प्रदेशमधील रायबरेलीच्या खासदार आहेत. एनडीटीव्हीने सूत्रांच्या हवाल्याने म्हटलं आहे की, सोनिया गांधी यांच्या रायबरेली मतदारसंघातून प्रियांका गांधी आगामी लोकसभा निवडणूक लढवू शकतात. राजस्थानमधील ३ जागांवर आणि हिमाचलमधील एका जागेवर राज्यसभेची निवडणूक होणार आहे. राजस्थानमधील दोन जागा भाजपाच्या खात्यात तर एक जागा काँग्रेसला मिळण्याची शक्यता आहे. तसेच हिमाचलमधील जागाही काँग्रेसच्या खात्यात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोनिया गांधी राजस्थान किंवा हिमाचलमधील जागेची निवड करू शकतात.१३ राज्यातील ५६ राज्यसभा जागांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपणार आहे. तर, उर्वरित दोन जागांचा कार्यकाळ ३ एप्रिल रोजी संपणार आहे. आंध्र प्रदेश ३, बिहार ६, छत्तीसगड १, गुजरात ४, हरयाणा १, हिमाचल प्रदेश १, कर्नाटक ४, मध्य प्रदेश ५, महाराष्ट्र ६, तेलंगणा ३, उत्तर प्रदेश १०, उत्तराखंड १, पश्चिम बंगाल ५, ओडिसा २, राजस्थान ३ अशा एकूण ५६ जागांसाठी २७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत १० जागा काँग्रेसला मिळू शकतात.सोनिया गांधी राज्यसभेवर गेल्या तर त्यांची कन्या आणि काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी या सोनिया गांधींच्या रायबरेली या मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवू शकतात. प्रियांका गांधी गेल्या काही वर्षांपासून उत्तर प्रदेशच्या राजकारणात सक्रीय झाल्या आहेत. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीवेळी त्यांनी राज्यभर काँग्रेसचा प्रचार केला होता. तसेच राज्यात पक्ष मजबूत करण्यासाठी प्रियांका गांधी मेहनत घेत आहेत. मागील लोकसभा निवडणुकीत प्रियांका गांधी यांनी सोनिया गांधींसाठी त्यांच्या रायबरेली मतदारसंघात प्रचार केला होता.राष्ट्रीय लोक दल (रालोद) या पक्षाचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी इंडिया आघाडीला रामराम केला आहे. चौधरी यांनी आपण आघाडीतून बाहेर पडत असल्याची घोषणा केली. तसेच त्यांच्या पक्षाने एनडीएत (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात काही वेळापूर्वी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिल्याची बातमी ताजी असतानाच उत्तर प्रदेशात काँग्रेससह इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे.रालोद एनडीएत सहभागी होणार असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून पाहायला मिळत होत्या. दरम्यान, जयंत चौधरी यांनी आज (१२ फेब्रुवारी) पक्षातील वरिष्ठ नेते, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीनंतर त्यांनी एनडीएत सहभागी होणार असल्याची घोषणा केली आहे. दरम्यान, रालोदचे आमदार एनडीएत सहभागी होण्याच्या विरोधात आहेत, असे दावे काही वृत्तवाहिन्यांनी केले होते. त्यावर चौधरी म्हणाले, मी आमच्या सर्व नेत्यांशी, आमदारांशी चर्चा केली आहे. सर्व आमदार आमच्या या निर्णयाच्या बाजूनेच आहेत. मोदी यांनी शुक्रवारीजयंत चौधरी यांचे आजोबा आणि भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत चौधरी चरण सिंह यांना भारत रत्न दिला जाणार असल्याची घोषणा केली.

### आघाडीतल्या नेत्यांचे सर्व दावे खोटे

» सरकारच्या या घोषणेनंतर रालोद प्रमुख जयंत चौधरी भावूक झाले. या पुरस्काराबद्दल जयंत चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. तसेच त्यांना सपा-काँग्रेसबरोबरची युती तोडून भाजपाबरोबर जाणार का? असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, आता कुठल्या तोंडाने मी नकार देऊ? दरम्यान, एनडीएत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यानंतर जयंत चौधरी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, आमचे आमदार आणि नेत्यांमधील नाराजीच्या बातम्या केवळ वृत्तवाहिन्यांवर पाहायला मिळत आहेत. मला वाटत नाही की कुठल्याही वृत्तवाहिनीने आमच्या नेत्यांशी बातचीत केली असेल. आम्ही सर्वांशी बोलूनच हा निर्णय घेतला आहे. आम्हाला खूप कमी कालावधीत हा निर्णय घ्यावा लागला आहे. फार वेळ घेण्यासारखी परिस्थिती आमच्यासमोर नव्हती. आम्ही आमच्या लोकांसाठी काहीतरी चांगलं करण्याच्या विचारात आहोत. त्यामुळेच आम्ही हा निर्णय घेतला आहे.इंडिया आघाडीतले पक्ष सातत्याने दावा करत होते की, जयंत चौधरी यांचा राष्ट्रीय लोक दल हा पक्ष त्यांच्या आघाडीचाच एक भाग आहे. जयंत चौधरी इंडिया आघाडी सोडून कुठेही जाणार नाहीत. आम्ही सर्व पक्ष मिळून आगामी लोकसभा निवडणूक एकत्रितपणे लढणार आहोत, परंतु, आघाडीतल्या नेत्यांचे सर्व दावे आता खोटे ठरले आहेत.

# 45 लाख विवाह होणार, 5.5 लाख कोटींचा व्यवसाय होणार!

## एकट्या दिल्लीत दीड लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या देशातील अनेक भागात लग्नसराईचीघाई पाहायला मिळत आहे. चालू महिन्यात लग्नाचे मुहूर्त असल्यानं लग्नाची उत्सुकता सर्वत्र पाहायला मिळत आहे. या हंगामात देशात 45 लाख विवाह होणार आहेत. त्यामुळं या हंगामात 5.5 लाख कोटींचा व्यवसाय होणार आहे. या काळात एकट्या दिल्लीत दीड लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होण्याची शक्यता वर्तवली जातेय.**

दिल्लीसह संपूर्ण देशातील व्यापारी वर्गात लग्नसराईची उत्सुकता पाहायला मिळत आहे. खरंतर, 15 जानेवारी ते 15 जुलैपर्यंत चालणाऱ्या या हंगामात देशात 45 लाख विवाहसोहळे होतील असा अंदाज आहे. देशात होणाऱ्या या विवाहसोहळ्यांमध्ये सुमारे साडेपाच लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल, असा अंदाज आहे. अंदाजे 5 लाख विवाहांसाठी प्रति विवाह खर्च 3 लाख रुपये असेल, तर अंदाजे 10 लाख विवाहांसाठी प्रति विवाह खर्च अंदाजे 6 लाख रुपये असेल. याशिवाय, 10 लाख विवाहांचा अंदाजे खर्च प्रति




विवाह 10 लाख रुपये असेल, तर 10 लाख विवाहांसाठी प्रत्येक लग्नासाठी 15 लाख रुपये खर्च येईल. देशातील व्यावसायिकांची संघटना असलेल्या कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) ची संशोधन शाखा कॅट रिसर्च अँड ट्रेड डेव्हलपमेंट सोसायटीने विविध राज्यांतील 30 वेगवेगळ्या शहरांतील व्यापारी आणि सेवा पुरवठादारांशी केलेल्या संभाषणाच्या आधारे हा अंदाज वर्तवला आहे. या लग्नसराईच्या हंगामात एकट्या दिल्लीत 4 लाखांहून अधिक विवाह होण्याची शक्यता आहे. ज्यातून सुमारे 1.5 लाख कोटी रुपयांचा व्यवसाय महसूल मिळणार आहे. गेल्या वर्षी 14 डिसेंबर रोजी संपलेल्या लग्नाच्या मोसमात सुमारे 35 लाख विवाह झाले होते, ज्याचा खर्च 4.25 लाख कोटी रुपये होता.

### प्रति लग्न 15 लाख रुपये खर्च

» या लग्नसराईच्या काळात अंदाजे 5 लाख विवाहांचा प्रति विवाह खर्च 3 लाख रुपये असेल, तर अंदाजे 10 लाख विवाहांसाठी प्रति विवाह खर्च अंदाजे 6 लाख रुपये असेल असा अंदाज आहे. याशिवाय, 10 लाख विवाहांचा अंदाजे खर्च प्रति विवाह 10 लाख रुपये असेल, तर 10 लाख विवाहांसाठी प्रति लग्न 15 लाख रुपये खर्च येईल, तर 6 लाख विवाहांसाठी प्रति लग्न 25 लाख रुपये खर्च येईल. याशिवाय 60 हजार विवाह ज्यांचा खर्च प्रति लग्न 50 लाख रुपये असणार आहे, तर 40 हजार विवाह ज्यांचा खर्च 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. लग्नाची ही मागणी लक्षात घेऊन देशभरातील संबंधित व्यापाऱ्यांनी लग्नाशी संबंधित वस्तूंचा पुरेसा साठा केला आहे.

# मीराने पती शाहिद कपूरसाठी शेअर केलेली ‘ती’ पोस्ट चर्चेत

शाहिद कपूर आणि मीरा राजपूत हे लोकप्रिय सेलिब्रिटी जोडपं आहे. शाहिद कपूरचा ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ चित्रपट ९ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालाय. आत्तापर्यंत या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. शाहिदच्या प्रत्येक गोष्टीत मीरा नेहमीच त्याची साथ देताना दिसते. ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ चित्रपटाचा रिव्ह्यू तिने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीला शेअर केला होता आणि आता शाहिदचा अभिनय क्षेत्रातील प्रवास दाखवणारा चाहत्यांनी बनवलेला व्हिडीओ मीराने रिपोस्ट केला आहे.शाहिद कपूर एक उत्तम अभिनेता व चांगला डान्सरही आहे. शाहिदच्या फॅन पेजवर डान्सरपासून अभिनेत्याचा प्रवास सांगणारा व्हिडीओ चाहत्यांनी बनवला होता. या व्हिडीओत ऐश्वर्या राय अभिनीत ‘ताल’ या चित्रपटातील शाहिदचा डान्स आहे जिथे शाहिद बॅकग्राउंड डान्सर म्हणून दिसत आहे तर पुढे ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ या शाहिदच्या चित्रपटातील त्याचा आणि क्रिती सॅननचा दमाखेदार डान्सही यात आहे.



“शाहिदचा डान्स पाहणं किती आनंददायी आहे, तो प्रशिक्षित डान्सर आहे आणि तो प्रत्येक गाण्याला न्याय देतो. एका बॅकग्राउंड डान्सरपासून ते उत्कृष्ट अभिनेता आणि नर्तक! शाहिद खूप अष्टपैलू आहे. एका व्यक्तीमध्ये इतक टॅलेंट आहे. त्याच्या चित्रपटातील नृत्यदिग्दर्शनही कौतुकास्पद आहे,” असं कॅप्शन फॅनपेजवरील व्हिडीओला देण्यात आलं होतं.मीराने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर हा व्हिडिओ रिपोस्ट केला. या व्हिडिओला कॅप्शन देत मीराने लिहिले, ‘ताल’ मधील बॅकग्राउंड डान्सरपासून आतापर्यंतच्या सर्व नृत्यांना त्याने मास्टरपिस बनवलं आहे.दरम्यान, शाहिदचा ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ चित्रपट चौथ्या दिवशीही चित्रपटगृहात बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसतोय. या चित्रपटात शाहिद कपूर एका रोबोट सायंटिस्टच्या भूमिकेत आहे, तर अभिनेत्री क्रिती सेनॉन एआय रोबोटच्या भूमिकेत आहे. डिंपल कपाडिया, राकेश बेदी, राजेश कुमार या कलाकारांच्याही यात महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## घटस्फोटानंतरही आमिरची पत्नी

बॉलीवूड अभिनेता आमिर खानची पूर्वाश्रमीची पत्नी किरण नेहमीच चर्चेत असते. दोन वर्षांपूर्वीच म्हणजे २०२१ मध्ये दोघांनी सहमतीने घटस्फोट घेतला. आमिर व किरणच्या या निर्णयाने चाहत्यांना मोठा धक्का बसला होता. परंतु, घटस्फोटानंतरही आमिर व किरणने आपली मैत्री टिकवून ठेवली आहे. अनेकदा ते एकमेकांना भेटत असल्याचेही समोर आले आहे. काही दिवसांपूर्वीच पार पडलेल्या आमिरची लेक आयरा खान हिच्या लग्नातील प्रत्येक समारंभात किरणने पुढाकार घेतला होता. या लग्नातले फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. घटस्फोटानंतरही किरणला आजही आमिरची पत्नी म्हणून संबोधले जाते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत किरणने तिच्या व आमिरच्या नात्यावर भाष्य केले आहे.‘लापता लेडीज’ चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान किरणने झूम या चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला “जेव्हा लोक तुम्हाला आमिर खानची पत्नी किंवा पूर्वाश्रमीची पत्नी म्हणतात तेव्हा तुम्हाला कसं वाटतं.

## आलियाचा हटके लूक चर्चेत



बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री आलिया भट्ट एक नवी सीरिज घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येते आहे. पोचर्स असं या सीरिजचं नाव आहे. ही सीरिज अ‍ॅमेझॉन प्राईमवर पाहता येणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रिची मेहता यांनी या सीरिजचं दिग्दर्शन केलं आहे. आलिया भट्ट या सीरिजची कार्यकरी निर्मातीही आहे. तसंच या सीरिजच्या टिझरमध्येही ती एकदम हटके लुकमध्ये दिसते आहे. पोचर्स या शब्दाचा अर्थ होतो शिकारी. अवैध शिकारींवर प्रकाश टाकणारी ही सीरिज असेल हेल या सीरिजचा दमदार टिझरच सांगतो आहे. पोचिंग म्हणजे बेकायदेशीररित्या केलेली शिकार आणि पोचर्स म्हणजे अवैध शिकारी. या प्रकरणावर प्रकाश टाकणारी ही वेबसीरिज आहे. यामध्ये एका लहान हत्तीची शिकार केली जाते ही घटना टिझरमध्ये दिसते आहे.वन अधिकाऱ्यांचा एक समूह जंगलात काहीतरी शोधतोय असं टिझरमध्ये दिसतं. त्यानंतर फ्रेममध्ये आपल्याला आलियाही दिसते. तिला कुठल्याश्या घटनेचा धक्का बसला आहे हे तिच्याकडे पाहून कळतं. तिचा लूक एकदमच हटके झाला आहे. अशोक का मर्डर सुबह ९ बजे रिपोर्ट हुआ. इस महिने का ये तिसरा हादसा. मर्डर इज मर्डर. असा संवादही आलियाच्या नॅरेशनमध्ये ऐकू येतो आणि समोर एक आकृती दिसते. छोटासाच टिझर पण प्रभावशाली झाला आहे.या सीरिजबाबत आलियाने सांगितलं की हा व्हिडीओ शूट करण्यासाठी मी जंगलात एक दिवसापेक्षा कमी वेळ घालवला. पण इतक्या कमी कालावधीतही मी घाबरले होते. मर्डर हा मर्डरच असतो.. पोचर्स दिग्दर्शित करणाऱ्या रिची मेहताने दिल्ली क्राईम ही सीरिजही दिग्दर्शित केली होती. २३ फेब्रुवारीपासून ही सीरिज स्ट्रीम होणार आहे.बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री आलिया भट्ट एक नवी सीरिज घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येते आहे. पोचर्स असं या सीरिजचं नाव आहे. ही सीरिज अ‍ॅमेझॉन प्राईमवर पाहता येणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रिची मेहता यांनी या सीरिजचं दिग्दर्शन केलं आहे. आलिया भट्ट या सीरिजची कार्यकरी निर्मातीही आहे. तसंच या सीरिजच्या टिझरमध्येही ती एकदम हटके लुकमध्ये दिसते आहे. पोचर्स या शब्दाचा अर्थ होतो शिकारी. अवैध शिकारींवर प्रकाश टाकणारी ही सीरिज असेल हेल या सीरिजचा दमदार टिझरच सांगतो आहे.

## जॅकी व दीपशिखा सख्खे बहीण-भाऊ

बॉलीवूड अभिनेता व चित्रपट निर्माता जॅकी भगनानी अभिनेत्री रकुल प्रीत सिंगशी लग्न करणार आहे. दोघेही २१ फेब्रुवारी रोजी लग्नबंधनात अडकतील. या दोघांच्या लग्नाची जोरदार तयारी चालू आहे. दोघेही गोव्यात लग्न करणार आहेत. तुम्हाला कदाचित माहित नसेल पण जॅकी भगनानीचं रितेश देशमुखच्या कुटुंबाशी खास नातं आहे.जॅकी भगनानी हा सुप्रसिद्ध निर्माते वाशू भगनानी व पूजा भगनानी यांचा मुलगा आहे. जॅकीला एक मोठी बहीण आहे. ही बहीण देशमुख कुटुंबाची सून आहे. जॅकी भगनानीची बहीण दीपशिखा ही लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांची पत्नी आहे. जॅकी व दीपशिखा हे दोघेही सख्खे बहीण-भाऊ आहेत. रकुल प्रित सिंग ही दीपशिखा देखमुखची वहिनी होणार आहे.जॅकी व दीपशिखा अनेक वेळा एकमेकांबरोबरचे फोटो शेअर करत असतात. दीपशिखा व धिरज यांच्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त जॅकी अनेकदा इन्स्टाग्रामवर पोस्ट करत असतो. दीपशिखादेखील चित्रपट निर्माती आहे. दीपशिखा व धिरज यांचं लग्न २०१२ मध्ये झालं होतं. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये आहेत.



## कंगना रणौतला बनायचे आहे भारताची पंतप्रधान?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जेन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याअगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती “जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन.”आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना ‘इमर्जेन्सी’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, ‘मी ‘इमर्जेन्सी’ नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. ‘इमर्जेन्सी’ हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे. ज्याबद्दल आपल्या भारतातील तरुणांना माहीती असावं असं मला वाटतं.”सोशल मीडियावर कंगना मोठ्या प्रमाणात सक्रिय असते निरनिराळे व्हिडीओ व फोटो पोस्ट करत ती चाहत्यांना अपडेट देत असते.

# टीम इंडियाला मोठा झटका!

## 15 मार्चपासून राजकोट येथे तिसरा कसोटी सामना

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाला मोठा झटका बसला आहे. भारताचा स्टार फलंदाज के. एल. राहुल राजकोट कसोटीतून बाहेर पडला आहे. राहुल दुखापतीतून अद्याप सावरलेला नाही. त्यामुळे त्याला तिसऱ्या कसोटी सामन्यात विश्रांती दिली जाणार आहे. भारत आणि इंग्लंडमध्ये येत्या १५ मार्चपासून राजकोट येथे मालिकेतला तिसरा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. राहुलऐवजी निवड समितीने कर्नाटकचा युवा खेळाडू देवदत्त पडिक्कल याचा संघात समावेश केला आहे.**




भारतीय संघ आणि इंग्लंडमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना जिंकून भारताने १-१ अशी बरोबरी केली आहे. मालिकेतल्या पहिल्या सामन्यात खेळताना राहुलला दुखापत झाली होती. राहुलच्या डाव्या पायाचे स्नायू दुखावले होते. त्यामुळे त्याला दुसऱ्या कसोटीत विश्रांती दिली होती. राहुल अद्याप पायाच्या दुखण्यातून सावरलेला नाही. त्यामुळे तिसऱ्या कसोटी सामन्यात निवड समितीने देवदत्त पडिक्कलचा संघात समावेश केला आहे.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दोन दिवसांपूर्वी इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा केली होती. याद्वारे भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली हा इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये खेळणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याचबरोबर दुखापतीमुळे श्रेयस अय्यरला भारतीय संघातून वगळण्यात आलं आहे. तर अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाचं संघात पुनरागमन झालं आहे. परंतु, बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे की जडेजा फिटनेस टेस्टमध्ये पास झाला तरच त्यांचा अंतिम ११ जणांच्या संघात समावेश केला जाईल. विराट कोहलीपाठोपाठ भारताचा मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरदेखील मालिकेतून बाहेर पडला आहे. दुखापतीमुळे तो उर्वरित मालिकेला मुकणार आहे. बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये सध्या त्याच्यावर उपचार चालू आहे. बीसीसीआय त्याच्या सुधारणेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यात 15 फेब्रुवारीपासून सुरु होणाऱ्या तिसऱ्या कसोटीपूर्वी टीम इंडियाला मोठा झटका बसला आहे. भारताचा विकेटकीपर फलंदाज के एल राहुल बाहेर पडला आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना राजकोट इथं खेळवला जाणार आहे. दोनच दिवसांपूर्वी भारताचा संघ जाहीर झाला होता. आगामी तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघात रवींद्र जाडेजा आणि के एल राहुल यांचा समावेश करण्यात आला होता. मात्र या दोघांचं खेळणं हे फिटनेस टेस्टवर अवलंबून होतं. आता के एल राहुल खेळणार नाही हे स्पष्ट झालं आहे. के एल राहुलऐवजी आता कर्नाटकच्या देवदत्त पड्डीकलला टीम इंडियात स्थान मिळण्याची शक्यता आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघांनी 1-1 असा विजय मिळवला आहे. दरम्यान, इंग्लंडकसोटी मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांसाठी बीसीसीआयनं टीम इंडियाचा संघ जाहीर केला आहे. आगामी तीन सामन्यांसाठीही विराट कोहली संघात नाही. तो हे तीन सामने खेळणार नाही, अशी माहिती बीसीसीआयच्या वतीनं देण्यात आली आहे. श्रेयसला दुखापतीमुळे संघात स्थान मिळालेलं नाही. भारतीय संघ आणि इंग्लंडमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना जिंकून भारताने १-१ अशी बरोबरी केली आहे.

### इंग्लंडलाही धक्का

» मालिकेतल्या पहिल्या सामन्यात खेळताना राहुलला दुखापत झाली होती.जाडेजा आणि राहुलला दुखापतीमुळे विशाखापट्टणम येथील दुसऱ्या कसोटी सामन्याला मुकावं लागलं होतं.. दोघांच्या पुढच्या तीन सामन्यांत खेळण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात होतं. दरम्यान, तिकडे इंग्लंडलाही दुखापतीचं ग्रहण लागलं आहे. इंग्लंडला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा फिरकी गोलंदाज जॅक लीच जखमी झाल्याने मायदेशी परतला आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने ट्विटरवरून ही माहिती दिली आहे. भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान लीचला दुखापत झाली होती. हा सामना हैदराबादमध्ये खेळला गेला.

---

# ऑस्ट्रेलियाच्या संघाकडून अपीलच करण्यात आला नव्हता

## मालिकेतील अंतिम सामना 13 फेब्रुवारी रोजी पर्थ येथे होणार

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघासाठी कालचा दिवस अत्यंत खास ठरला. भारताच्या वरिष्ठ संघाप्रमाणेच काल युवा संघाला देखील शेवटच्या टप्प्यात येऊन ऑस्ट्रेलियाच्या विरुद्ध सामन्यात विश्वचषक गमवावा लागला. एकीकडे ऑस्ट्रेलियाच्या अंडर १९ संघाचा विश्वचषकातील विजय तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियाच्या वरिष्ठ संघाने सुद्धा वेस्ट इंडिजविरुद्ध काल सलग दुसरा विजय मिळवला.**




ग्लेन मॅक्सवेलच्या कारकिर्दीतील विक्रमी पाचव्या शतकाच्या जोरावर (१२०) ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या T20I स्पर्धेत ३४ धावांच्या फरकाने २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. या मोठ्या विजयाच्या सेलिब्रेशनआधीचा एक प्रसंग मात्र चकित करणारा व तितकाच हास्यास्पद ठरला.वेस्ट इंडिजच्या आव्हानाचा पाठलाग करण्याच्या शेवटच्या षटकात अल्झारी जोसेफने, स्पेन्सर जॉन्सनचा दुसरा चेंडू कव्हरकडे वळवला. कर्णधार मिचेल मार्शने शांतपणे चेंडू झेलून लगेच गोलंदाजाकडे टाकला. चपळाईने जॉन्सनने जोसेफ क्रिझमध्ये येण्यापूर्वीच त्याला धावबाद केले. अत्यंत स्पष्टपणे जोसेफ बाद झाल्याने मार्श आणि जॉन्सनसह ऑस्ट्रेलियाचा संघ आनंद साजरा करू लागला पण तितक्यात पंचांनी हे सेलिब्रेशन थांबवण्यासाठी मध्यस्थी केली. इथे पंचांनी चक्क जोसेफ नाबाद असल्याचे सांगितले, आणि यासाठी दिलेलं कारण सध्या चर्चेत आलं आहे.पंचानी जोसेफला नाबाद घोषित करण्याचे कारण सांगितले की, धावबाद केल्यावर ऑस्ट्रेलियाच्या संघाकडून अपीलच करण्यात आला नव्हता, त्यामुळे नियमानुसार फलंदाजाला बाद घोषित करता येणार नाही. हे ऐकून ऑस्ट्रेलियाच्या कर्णधारासह सगळेच चकित झाले होते. मार्कस स्टॉइनिस आणि जोश हेझलवूड तर हे ऐकून हसायलाच लागले होते.

### बाद तरी नाबाद कारण..

» तर टिम डेव्हिडने सुद्धा 'हा विचित्र प्रकार आहे' असं म्हणत आश्चर्य व्यक्त केलं.MCC कायद्याच्या कलम 31.1 नुसार, पंच अपील केल्याशिवाय फलंदाजाला आऊट देऊ शकत नाहीत. नियम सांगतो की, "कोणत्याही अंपायरने फलंदाजाला थेट बाद घोषित करू नये, जरी तो/ती बाद झाला असेल तरीही, जोपर्यंत क्षेत्ररक्षक अपील करत नाही तोपर्यंत त्याला बाद देता येणार नाही. प्रतिस्पर्धी संघाने विकेटसाठी अपील केलं नसलं तरी नियम कोणत्याही फलंदाजाला स्वेच्छेने मैदान सोडण्यापासून रोखू शकत नाहीत."दरम्यान, यानंतरही ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी वेस्ट इंडिजची लढत रोखण्यात यश मिळवले. यजमानांनी पाहुण्यांना नऊ बाद २०७ धावांवर रोखले होते. या दौऱ्यातील वेस्ट इंडिजचा हा सलग पाचवा पराभव ठरला आहे.